Diploma Programme
Programme du diplôme
Programa del Diploma

# Marathi A: literature – Standard level – Paper 1
# Marathe A : littérature – Niveau moyen – Épreuve 1
# Marathi A: literatura – Nivel medio – Prueba 1

Wednesday 10 May 2017 (afternoon)
Mercredi 10 mai 2017 (après-midi)
Miércoles 10 de mayo de 2017 (tarde)

1 hour 30 minutes / 1 heure 30 minutes / 1 hora 30 minutos

---

### Instructions to candidates

- Do not open this examination paper until instructed to do so.
- Write a guided literary analysis on one passage only. In your answer you must address both of the guiding questions provided.
- The maximum mark for this examination paper is **[20 marks]**.

### Instructions destinées aux candidats

- N'ouvrez pas cette épreuve avant d'y être autorisé(e).
- Rédigez une analyse littéraire dirigée d'un seul des passages. Les deux questions d'orientation fournies doivent être traitées dans votre réponse.
- Le nombre maximum de points pour cette épreuve d'examen est de **[20 points]**.

### Instrucciones para los alumnos

- No abra esta prueba hasta que se lo autoricen.
- Escriba un análisis literario guiado sobre un solo pasaje. Debe abordar las dos preguntas de orientación en su respuesta.
- La puntuación máxima para esta prueba de examen es **[20 puntos]**.

2217 – 0599



© International Baccalaureate Organization 2017

International Baccalaureate®
Baccalauréat International
Bachillerato Internacional

https://xtremepape.rs/

कोणत्याही **एका** उता-याचे मार्गदर्शक प्रश्नांच्या आधारे वाङ्मयीन विश्लेषण लिहा. उत्तर लिहिताना दोन्ही मार्गदर्शक प्रश्न लक्षात घेणे आवश्यक आहे.

**1.**

चेहरा ही माणसाच्या व्यक्तिगत जीवनातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट. स्वतःच्या चेह-याबद्दल माणसाला वाटणारं आकर्षण कुठल्याही आकर्षणाहून बलवत्तर असतं. कुरुपालाही आपला चेहरा आरशात पाहायला आवडतो मग सुंदर चेह-याबद्दल तर काय बोलावं? हा चेहरा म्हणजे माणसाला मिळणा-या सामाजिक प्रतिष्ठेचं पहिलं वरदान. पण काय नवल? माणसाला दोन अवयवांचे प्रत्यक्ष दर्शन घडत नाही. चेह-याचे नि पाठीचे. पाठ म्हणजे एक आंधळा भाग. पण दोन डोळे, दोन कान, नाक नि जीभ, ही रूप, नाद, गंध नि रस यांचे अप्रूप. अनुभवाचे विश्वच देणारी चार इंद्रिये या चेह-यात असूनही तो काही आपले आपल्याला पाहू शकत नाही. त्याची ओळख पटायची ती दुस-यांनी त्याला पाहिले की त्याच्या दर्शनाच्या प्रतिबिंबातून. म्हणजे माणूस स्वतःपुरता बिनचेह-याचाच असतो. अनुभवाने अलिप्त असतो. आरसा किंवा स्वच्छ जलाशय यांतच चेह-याला स्वतःचे दर्शन घडते. ग्रीक कथांतल्या नार्सिससने स्वतःचे रूप तळ्यातल्या जलात पाहिले नि तो त्या प्रतिबिंबाच्या प्रेमात पडला. आत्मप्रेमाचे हे उदाहरण फार प्रसिद्ध आहे.

आपल्याकडे याच्याहीपेक्षा अद्भुत गोष्ट घडून गेली आहे. अर्थात कोण्या एका काळी यज्ञदत्त नावाचा एक अत्यंत सुंदर तरूण होता. आपला चेहरा आरशात निरखायचा त्याला अतिशयच छंद जडला. इतका की त्या प्रतिबिंबित चेह-याशिवाय त्याला दुसरेतिसरे काही सुचेचना. आपला चेहरा प्रत्यक्षात बघायचा ध्यास त्याने घेतला. घर, दार, सारे काही सोडून तो चेह-याच्या शोधात भटकत राहिला. चेहरा काही सापडेना. हात लावून तो कळत होता. पण दिसत नव्हता. यज्ञदत्त भटकता भटकता निराश झाला. विनवणी करून, व्रत करून चेह-याचे दर्शन होईना. आरशाचे ढोबळ माध्यमच त्याला पाहायला लागावे हे शल्य त्याला रूपू लागले. त्याचा जीव कासावीस झाला. प्राण उडू लागले. एक विचार वीजेसारखा त्याच्या मनात आला. त्याला उमजले की आपला चेहरा दुनियेत कुठे नाही तर तो आपल्याच डोक्याच्या पुढल्या जागी आहे. तो सुरेख आहे की नाही ही गोष्ट गौण आहे. आपला चेहरा डोक्याला चिकटलेला आहे हीच गोष्ट महत्त्वाची आहे. झाले! क्षणार्धात त्याची चेहरा पाहण्याची वासना मावळली. ती वासना सर्वंकष वासना असल्यामुळे त्याचे चित्त आता पूर्णपणे मोहमुक्त झाले. त्याला ज्ञान प्राप्त झाले.

महायान बौद्धपंथाचे सुरंगमसुत असे सांगत, की लगेच शांतचित्त होऊन यज्ञदत्ताने ऐहिक जीवनाकडे पाठ फिरवली आणि तो दीक्षा घेऊन भिक्षू झाला.

आरशाशिवाय चेहरा दुस-याच्या डोळ्यांत आपल्याला दिसतो. आणि त्या नजिकच्या स्नेहमयी डोळ्यांतल्या दर्शनाने आपण खूप सुखी होतो. बापड्या यज्ञदत्ताला हे कळते तर असंख्य प्रेमयुक्त चेह-यांची दर्शने त्याच्या डोळ्यांत लोकांनाही घडली असती. कारण चंद्रवदन युवकाच्या डोळ्यांत डोकावून बघणं कुणा रमणीला आवडलं नसतं? पण यज्ञदत्त फक्त चेह-याच्या शोधात होता. त्या चेह-याच्या शोधानं झपाटलेला होता. आत्मप्रेमाच्या केव्हाच पुढे गेला होता. त्याला सत्य कळले तेही दर्शन मागे पडले तेव्हा. तेव्हा एक जीवघेणी आच संपली नि त्याची संथ वाटचाल चालू झाली. त्याला आता काहीच शोधायचे नव्हते. बोध झाला नि शोध संपला. आम्ही शोधही घेत नाही नि बोधही घेत नाही. यज्ञदत्त नि आम्ही यांच्यामध्ये फक्त एका सुताचे अंतर आहे, पण ते काही ओलांडण्यासारखे नाही.

आम्ही चेहरा हा चेहरा ठेवीत नाही. त्याचा मुखवटा बनवतो. लोकांच्या प्रेरणांप्रमाणे चलाख होऊन तो घडवतो आणि मग तो चढवूनच वावरतो. तो मग इतका घट्ट बसतो की खरा चेहरा कधी दिसतच नाही. आरशातसुद्धा. फोटोतसुद्धा. तो मुखवट्याच्या थडग्याखाली गाडला जातो. एखाद्याच भाग्यवानाला हे थडगे फोडून आपला चेहरा फिरून वर काढणे जमते.

दुर्गा भागवत, *दुपानी* (१९९५)

(अ) वरील उता-याबाबतचे तुमचे आकलन काय आहे?

(ब) वरील उता-यात मुख्य आशयसूत्राचा आविष्कार कशा पद्धतीने झाला आहे?

https://xtremepape.rs/

**2.**

**माफ करा**

जगणे कठीण झाले आहे तरी जगायचे आहे
साहण्यासारखे अजून पुष्कळ साहायचे आहे
घडीभर अंधार राहिल नंतर पहाटच आहे

मग आजच सारी आयुधें टाकून येऊंच का?
माफ करा एवढे काम मला सांगूच नका!

आपलें म्हणून काही राहिले नाही माहित आहे
दिवस येतो, सुनाच जातो, हें सारे माहित आहे
कधी वाट मिळते, कधी मुकी होते, माहित आहे

चाचपीत, ठेंचाळत चालणे सोडून द्यावेच कां?
माफ करा एवढे काम मला सांगूच नका!

ता-यांच्याहि पुढची दुनिया माझ्या नजरेंत आहे
एक फुल, एक हृदय, एक ग्रंथ नजरेंत आहे
नजर रोखून बसलों तो क्षणहि समीप आहे

काळोखाचे कैदी तुम्ही उगा धाक दावूच नका!
माफ करा एवढे काम मला सांगूच नका!

नारायण सुर्वे, *ऐसा गा मी ब्रह्म* (१९६२)

(अ) कवीच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणाविषयी काय सांगता येईल?

(ब) कवीने वापरलेल्या प्रतिमा कवितेच्या अर्थाला कसा उठाव देतात?

https://xtremepape.rs/